सी.एन.आर.क्र. एम.एच.डी.एच.०४०००५२९२०२१

<u>म.सं.कौ.हिं.का.क्र.१५/२०२१ मधील नि.क्र.२१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज जाब देणार क्र.१ ते ३ यांनी त्यांचे विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविणेबाबत झालेला आदेश रद्द होवुन त्यांचेतर्फे मुळ अर्ज व नि. क्र. ५ कडील अर्जाचे कामी खुलासा सादर करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व जाब देणार क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. मुळ अर्ज हा कौं.हि.म.सं. अधिनियम कलम १२ सह १७, १८, १९, २० व २२ प्रमाणे केलेला आहे. प्रकरणाच्या अभिलेखाचे अवलोकनकरता असे दिसून येते की, जाब देणार क्र. १ ते ३ यांना नोटीसीची योग्यरित्या बजावणी होवून देखील ते गैरहजर राहिल्याने त्यांचे विरुध्द दि. २६.०९.२०२२ रोजी प्रस्तुतचे प्रकरण त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविणेबाबत आदेश पारित करण्यात आलेला आहे. जाब देणार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयामध्ये गैरहजर राहण्याबाबत दिलेले नोटीसीची बजावणी योग्यरित्या झाली नसलेबाबत व पक्षकारांमधील तडजोडीचे प्रयत्न चालु असलेबाबतची कारणे संयुक्तिक वाटत नाही. परंतु, प्रकरणाचे स्वरुप व अर्जदारातर्फे प्रकरणामध्ये करण्यात आलेल्या मागण्या यांचा सारासार विचार करता, प्रस्तुत जाब देणार क्र. १ ते ३ यांना

त्यांच्या बचावाकरिता उचित संधी देणे न्यायोचित ठरेल. जाब देणार क्र. १ ते ३ यांचे विरुध्द प्रकरण एकतर्फी चालविणेबाबत झालेला आदेश रद्द करुन त्यांना याकामी लेखी जबाब व म्हणणे सादर करण्याची संधी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणारे नाही. उलटपक्षी, अर्जदार व जाब देणार यांच्या मधील वाद खऱ्या अर्थाने, प्रकरण गुणदोषांवर चालून, न्यायनिर्णीत करण्यास या न्यायालयाला मदतच होणारी आहे. त्याद्वारे न्यायालयीन प्रकरणांची पुढील गुंतागुंत देखील टाळता येणारी आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे हेच न्यायहितार्थ असेल असे माझे मत आहे. त्याचबरोबर, अर्जदारला होणाऱ्या त्रासाचा विचार करता, न्यायाचा समतोल राखण्याकरीता अर्जदारास योग्य असा खर्च देणे आवश्यक आहे, असे ही माझे मत आहे. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज, जाब देणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारस प्रत्येकी रुपये २००/– (रक्कम रुपये दोनशे) इतका खर्च देण्याच्या अटीवर, मंजूर करण्यात येतो.

२. जाब देणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारस वर म्हणल्याप्रमाणे खर्चाची रक्कम पुढील नेमले तारखेस अथवा तत्पूर्वी अदा केल्यानंतरच त्यांचे विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविणेबाबत झालेला दि.२६.०९.२०२२ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला असे समजण्यात येईल.

ठिकाण : दोंडाईचा
दिनांक : ०१/०७/२०२३

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग-१, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - ०१.०७.२०२३ |

स्वाक्षरित/-
लघुलेखक.